नोंदणी क्र.MSCS/CR/1259/2016 रिझर्व्ह बँक लायसन्स क्र.पी.६८७

**अमृतमहोत्सवी**

# श्री वीरशैव को-ऑप.बँक लि.,कोल्हापूर (मल्टीस्टेट बँक)

प्रधान कार्यालय - ५१७ ए/१ ताराराणी चौक, कोल्हापूर ४१६००१ फोन-(०२३१)२५३६९४० ते ४२,

**E-mail - info@shriveershaivbank.com, Website - www.veershaivbank.co.in**

## वार्षिक सर्वसाधारण सभा

## जाहीर नोटीस (फक्त भागधारक सभासदांकरिता)

आपल्या बँकेच्या सर्व भागधारक सभासदांना कळविणेत येते की, बँकेची सन २०१७-२०१८ या सालची **वार्षिक सर्वसाधारण** सभा मंगळवार **दि.१४.०८.२०१८ इ.रोजी दुपारी २.०० वाजता आपल्या बँकेच्या ताराराणी चौक, कोल्हापूर येथील प्रधान कार्यालय सभागृहात** खालील विषयांवर विचारविनीमय करणेसाठी होणार आहे. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे, अशी विनंती आहे.

**सभेपुढील विषय**

१. दि.१४.०८.२०१७ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.

२. सन २०१७-२०१८ चा वार्षिक अहवाल आणि दि.३१ मार्च २०१८ चा लेखापरिक्षीत ताळेबंद, नफा-तोटा पत्रकाचा विचार करणे व स्विकृत करणे.

३. सन २०१७-२०१८ सालात अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे व सन २०१८-२०१९ या सालाकरीता संचालक मंडळाने सुचविलेल्या उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकाची व विकास आराखडा योजनेची नोंद घेणे.

४. सन २०१७-२०१८ सालची मा.संचालक मंडळाने सुचविलेली नफा विभागणी मंजूर करणे आणि लाभांश शिफारशी प्रमाणे जाहीर करणे.

५. सन २०१७-२०१८ या सालचे वैधानिक लेखापरिक्षक मे.सुनिल नागावकर आणि कंपनी प्रोप्रा.श्री सुनिल सुहास नागावकर यांचेकडून आलेला वैधानिक लेखापरिक्षण अहवाल व सन २०१६-२०१७ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचा दोष दुरूस्ती पूर्तता अहवाल स्विकृत करणे.

६. सन २०१८-२०१९ वर्षाकरिता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणेबाबत निर्णय घेणे.

७. सन २०१७-२०१८ सालात संचालक व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाच्या माहितीची नोंद घेणे.

८. सन २०१७-२०१८ सालात बँकेच्या एकरक्कमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत सवलत देणेत आलेल्या कर्ज खा त्यांची नोंद घेवून त्यास मंजुरी देणे.

९. शासन अधिकृत वसुली अधिकारी यांनी शिफारस केलेली वसुली होणे अशक्य असलेली व वैधानिक लेखापरिक्षक यांनी प्रमाणित केलेली कर्जखाती निर्लेखीत करणेबाबत केलेल्या शिफारशीनुसार कर्जे निर्लेखित करणेस आणि मा.संचालक मंडळाने कर्जातील दिलेल्या दंड व्याज, खर्च इ.सवलतीस मान्यता देणे.

१०. संचालक मंडळाने सुचविलेल्या बँकेच्या उपविधीमधील दुरूस्ती स्विकारणे व त्यास मान्यता देणे.

११. वार्षिक सर्वसाधारण सभेस सभासदांच्या अनुपस्थितीस माफी (Condone) देणेबाबत विचार करणे.

१२. मा.अध्यक्षसो यांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयांवर चर्चा करणे.

मा.संचालक मंडळाच्या आदेशावरून

| | | |
|---|---|---|
| स्थळ - कोल्हापूर | **श्री.अविनाश रामचंद्र खोत** | **डॉ.दिलीप रामचंद्र चौगुले** |
| तारीख - २०/०७/२०१८ | प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

---

टीप : १) ठरलेवेळी गणपूर्ती न झालेस नोटीसीत नमूद केले ठिकाणी अर्ध्या तासानंतर वार्षिक सर्वसाधारण सभा घेणेत येईल व त्याला गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही. त्यात वरील विषयांचा विचार केला जाईल.

२) सन्माननीय सभासदांनी सभेपुढील ठेवावयाच्या आपल्या काही लेखी सूचना असतील तर बँकेच्या प्रधान कार्यालयाकडे दि.०७/०८/२०१८ पर्यंत पोहोचतील अशा पाठवाव्यात.

---

सूचना :

१. ज्या सभासदांची मुले/मुली १०वी, १२वी व पदवीधर/पदव्युत्तर परीक्षेत २०१८ मध्ये ७५% पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेली आहेत, त्यांनी आपले नावे दि.१०/०८/२०१८ पुर्वी प्रधान कार्यालयात पाठवावीत.

२. बँकेचा दि.३१ मार्च २०१८ चा लेखापरिक्षीत ताळेबंद व नफा-तोटा पत्रक बँकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द केले आहे याची नोंद घ्यावी.